**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदलीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-१०२४/प्र.क्र.५५६/(ई-११२१३५३ )एनएचएम**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २७ मे, २०२५.

**वाचा :-**

(१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- बैठक-२८२३/ प्र.क्र २८/ आरोग्य-७ , दिनांक १०.१२.२०२४

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्रमांक:- संकिर्ण-१०२४/ प्र.क्र ५५६/ आरोग्य-७, दिनांक २१.१२.२०२४

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्रमांक:- संकिर्ण-१०२४/ प्र.क्र ५५६ (भाग-१) / आरोग्य-७, दिनांक २१.१२.२०२४

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांची संपूर्ण सेवा कालावधीत एकवेळची विशेष बाब म्हणून विनंती बदली करण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदलीसंदर्भात संदर्भ क्र. २ अन्वये शासन आदेश निर्गमित करण्यात आला. तथापि, सदर बदली आदेशास त्याच दिवशी म्हणजे दिनांक २१/१२/२०२४ रोजी पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली होती. त्यानुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या विनंती बदल्याबाबत आता नव्याने संपूर्ण कार्यवाही करावयाची असल्याने याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१) उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील दिनांक २१.१२.२०२४ रोजीचे समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदलीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

CamScanner

२) संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील मुद्दा क्र.१ येथे समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदली करण्यासंदर्भातील सार्वजनिक आरोग्य विभागाचे मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव हे सक्षम प्राधिकारी राहतील असे नमूद आहे. त्याऐवजी समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदली करण्यासंदर्भात आंतर जिल्हा बदलीसाठी संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच जिल्हांतर्गत बदलीसाठी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

३) संदर्भ क्र. १ या शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ८ येथे समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या विनंतीनुसार प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्तरावर करण्यात येईल असे नमूद आहे. त्याऐवजी समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या विनंतीनुसार प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी आंतर जिल्हा बदलीसाठी संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई व जिल्हांतर्गत बदलीसाठी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी हे करतील.

४) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या सन २०२५ या वर्षीच्या नियोजित बदल्या एप्रिल-मे या कालावधीत करणे शक्य नाही. तरी सदर बदल्या ह्या जुलै अखेर पर्यंत करण्यात याव्यात. तसेच यापुढील वर्षीच्या बदल्याबाबतची कार्यवाही एप्रिल-मे महिन्यात करण्यात यावी.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०५२७१६५८१९६०१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL SAWARE

Digitally signed by ANIL SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL SAWARE
Date: 2025.05.27 18:50:27 +05'30'

**(अनिल वि. सावरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.



CamScanner

४. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर.
५. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६ . सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
७. संचालक (आरोग्य सेवा-१), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
८. संचालक (आरोग्य सेवा-२) आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे.
९. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई.
१०. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे.
११. उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
१२. जिल्हा आरोग्य अधिकारी, (सर्व जिल्हे)
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
१६. सर्व कोषागार अधिकारी.
१७. निवडनस्ती (कार्यासन एनएचएम).



CS CamScanner